नि.फौ.ख.क्र. ५३४ /२१
सरकार वि. श्रध्दा
निशाणी. ८

**सरकारतर्फे साक्षदार क्र. ३ यांची शपथेवर सरतपासणी सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव : अमरजित हेमराज डेकाटे
वय : अंदाजे ३० वर्षे,
धंदा : नोकरी
राहणार : वाठोडा रोड, पावर हाउसजवळ, नागपूर.

**सरकार पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती छावरीया यांचेकडून**

१. मला पोलीसांनी पंचनाम्याकरीता माझया घराजवळ बोलावीले होते. पोलीसांनी चोरी झाल्याबाबत पंचनामा केला होता. त्यावर माझी सही आहे. तो मला पोलीसांनी वाचून दाखवीला होता. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.९ देण्यात येत आहे.

**उलट तपासणी आरोपीतर्फे ॲड श्री. एस.एम.माटे** :

२. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी ही माझया घराच्या बाजुला राहते व माझया शेजा-याशी माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आज मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास - नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

माझे समक्ष,

स्वाक्षरी/-
(एस.बी.पवार)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर
दिनांक : ०८/०६/२०२२

नि.फौ.ख.क्र. ५३४ /२१
सरकार वि. श्रध्दा
निशाणी. ७

**सरकारतर्फे साक्षदार क्र. २ यांची शपथेवर सरतपासणी सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव : विजया पल्लीस्वामी सेट्टी
वय : अंदाजे ५५ वर्षे,
धंदा : व्यापार
राहणार : नंदनवन, नागपूर.

**सरकार पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती छावरीया यांचेकडून**

१. आज मी आरोपीला ओळखतो कारण एक वर्षापुर्वी नवीन बसस्टॅन्ड जवळ माझया दुकानात आली होती व त्यावेळेस आरोपीने मला सांगीतले होते की तिचा भाउ बिमार आहे व तिला तिचे दागीणे गहाण ठेवायचे आहे. त्यावेळेस तिने एक आंगठी व कानातले टॉप्स दाखवीले. त्यानंतर मी तिला घरी घेवून गेली व तिला पाणी दिले व त्यावेळेस मी तिला १४ हजार रुपये दिले. तिचे कानातील टॉप्स व आंगठी एका डब्यात ठेवले. त्यानंतर दोन-तिन दिवसांनी एक इसम व दोन, तिन बाया आल्या व त्यांनी आरोपीने गहाण ठेवलेले सामान चोरीचे असल्याचे सांगीतले त्यामुळे मी त्यांना ते आंगठी व टॉप्स परत दिले. त्यानंतर पोलीसांनी माझे बयान नोदंवीले.

**उलट तपासणी आरोपीतर्फे ॲड श्री. एस.एम.माटे** :

२. मला घटनेनंतर पोलीसांनी आठ दिवसानंतर बोलावीले होते. मी पोलीसांना सांगीतले होते की तिन चार दिवसानंतर ३ ते ४ बाया व एक इसम आला होता व माझया कडे गहाण ठेवलेले दागीणे चोरीचे असल्याचे सांगीतले होते व ते त्यांनी परत नेले होते परंतु सदरील बाब पोलीसांनी माझया बयानात का नोंदवीली नाही याचे कारण मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी माझयाकडे काहीही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे आहे की मागच्या महीण्यात एक तारीख कोणत्या दिवशी होती हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझे कडे माझया दुकानात आली व दागीणे गहाण ठेवून माझयाकडेन १४,०००/- घेतले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की माझया दुकानात गर्दी राहात असते व

रोज वेगवेगळे लोक येतात. हे म्हणणे खरे आहे की माझया दुकानात येणा–या प्रत्येक लोकांना मी ओळखत नाही.

**फेरतपास – नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

माझे समक्ष,

स्वाक्षरी/–
(एस.बी.पवार)
मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर
दिनांक : ०८/०६/२०२२